**प्रेस नोट दिनांक २०/०३/१९**

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## लहान मुलास आई-वडिलांच्या ताब्यात सुरक्षितपणे दिलेबाबत...

दिनांक १८/०३/१९ रोजी रात्रौ ०२.०० वा चे सुमारास रामनगर मार्शल पो.शि.चॉंद शेख हे रामनगर चौकी हद्दीत पेट्रोलींग डयुटी करीत असताना गणपती माथा बस स्टॉपवर त्यांना एक अंदाजे ४० वर्ष वयाचा एक इसम दारूच्या नशेत बसलेला दिसला. त्याचे बरोबर एक ७ वर्षाचा मुलगा होता व तो बस स्टॉपवर झोपलेला होता. त्याने सदर मुलास कोठून तरी पळवून आणले असावे असा संशय वाटल्याने त्यांनी सदर इसमास हटकून त्यास त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव हनुमंत खोमणे,रा.दौंड असे असल्याचे सांगितले. त्यास त्याचे बरोबर असलेल्या मुला बाबत विचारणा केली असता, सदर मुलाचे नाव वसंत सोमनाथ ठोसर,वय-०७ वर्ष,रा.जगताप मळा,कडेठाण,दौंड असे असल्याचे सांगून मुलाचे आई-वडिल व तो असे ससून हॉस्पिटल मध्ये मुलाच्या आईस औषधोपचारकामी घेऊन आले होते. त्यावेळी मुलाच्या आईस डॉक्टरांनी ॲडमिट करून घेतले. तेव्हा पेंशट जवळ फक्त एक माणूस थांबण्याची परवानगी असल्याचे त्यांना सांगण्यात आल्याने मुलाच्या आई-वडिलांना सांगून मुलाला घेऊन तो त्याचे उत्तमनगर येथे राहणा-या नातेवाईकांच्या घरी आला होता. परंतु नातेवाईकांचा नक्की पत्ता माहिती नसल्याने व तो यापूर्वी १० वर्षापूर्वी त्याचे नातेवाईकांकडे आला होता. त्याला त्याचे नातेवाईकांचे घर मिळून आले नाही म्हणून तो गणपती माथा येथील बस स्टॉपवर मुलाला झोपवून तो बसला होता. वगैरे मजकूर सांगितला. त्याने सांगितलेली हकीकत पडताळण्या साठी रात्रगस्त अधिकारी स.पो.नि.उकिर्डे यांनी पो.ना.खोत, पो.शि.यादव व म.पो.शि. थोरात यांना सदर इसमास व मुलास ससून हॉस्पिटल येथे घेऊन जाऊन खात्री करणेबाबत आदेश दिला. तरी नमुद पोलीस कर्मचारी यांनी ससून हॉस्पिटल येथे जाऊन हनुमंत खोमणे याने सांगितलेल्या हकीकतीची पडताळणी केली असता,सदर हकीकत खरी असल्याचे निष्पन्न झाले. सदर सात वर्षाच्या मुलास त्याची आई सौ. सुरेखा सोमनाथ ठोसर यांच्या ताब्यात देऊन पुन्हा मुलाला दारूडयाच्या ताब्यात न देणेबाबत समज दिली आहे.


केसपेपर